महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ ०५ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०१४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# आज धडाडणार ठाकरे बंधूंच्या तोफा

## तब्बल १९ वर्षांनंतर राज आणि उद्धव ठाकरे एकाच मंचावर दिसणार !




दै. ठाणे जीवनदीप वार्ता


महाराष्ट्रात पहिलीपासून हिंदी भाषा सक्तीच्या विरोधातील आंदोलन यशस्वी ठरल्यानं विजयाची सभा उद्या वरळीच्या 'एनएससीआय डोम' या सभागृहात पार पडणार आहे. ही सभा ऐतिहासिक ठरणार आहे, कारण तब्बल 19 वर्षांनंतर दोघे ठाकरे बंधू एकाच व्यासपीठावर येणार आहेत. इतकंच नव्हे तर दोन्ही ठाकरेंची एकत्र भाषणंही होणार आहेत. विशेष म्हणजे दोन्ही ठाकरे एकत्र येणार असल्यानं शिवसैनिक आणि मनसैनिक अशा दोन्ही कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह असून दुसरीकडं सामान्य मराठी माणसाचं देखील या सभेकडं लक्ष लागून राहिलं आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या ठाकरे बंधूंचीच चर्चा सुरु आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोन्ही बंधूंनी एकत्र येत शनिवारी ५ जुलै २०२५ रोजी विजयी मेळाव्याचे आयोजन केले आहे. येत्या ५ जुलै २०२५ रोजी वरळीतील एन.एस.सी.आय. डोम येथे होणाऱ्या 'विजयी मेळाव्या'ची चर्चा सध्या जोरदार सुरू आहे. मुंबई, ठाणे यांसह राज्यभर बॅनरबाजी सुरू असतानाच, आता या मेळाव्याचा एक टीझरही प्रदर्शित करण्यात आला आहे. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे.

या निमित्त नुकतंच एक टीझर प्रदर्शित झाला आहे. या टीझरमध्ये आवाज महाराष्ट्राचा, आवाज मराठी माणसाचा, आवाज ठाकरेंचा हे वाक्य ठळकपणे ऐकायला मिळत आहे. या टीझरमध्ये प्रबोधनकार ठाकरे, बाळासाहेब ठाकरे यांचे भाषणादरम्यानचे फोटो पाहायला मिळत आहे. त्यासोबतच यात आता ठाकरेंनी पुन्हा हाक दिलीय महाराष्ट्राला... वाजत गाजत गुलाल उधळत या..." असे नमूद करण्यात आले आहे.

> महाराष्ट्राच्या राजकारणात आज एक ऐतिहासिक घटना होणारआहे. तब्बल 19 वर्षांनंतर महाराष्ट्राच्या राजकारणातील दोन वाघ राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एका मंचावर एकत्र येत आहे. निमित्त आहे, मराठी भाषेसाठी हे ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. राज्य सरकारने काही दिवसांपूर्वी त्रिभाष म्हणजे शालेय अभ्यात हिंदी सक्तीचा एक जीआर काढला होता. त्या जीआरविरोधात मराठी माणसासह उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एल्गार पुकारला. मराठीच्या मुद्दावर सरकारविरोधात दोन्ही भाऊ एकत्र येत आज 5 जुलैला मोर्चा काढणार होते. पण त्यापूर्वी राज्य सरकारने तो जीआर रद्द केला. आता हे दोन भाऊ मराठी माणसाच्या विजय साजरा करण्यासाठी आज विजय मेळावा घेत आहेत.

थोडक्यात महत्वाचे

## काटई निळजे उड्डाण पूल वाहतुकीसाठी खुला



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - शिळफाटा रस्त्यावरील पलावा चौकाजवळील तीन वर्षापासून संथगतीने काम सुरू असलेला दिवा-पनवेल रेल्वेमार्गावरील काटई निळजे उड्डाण पूल शुक्रवारी उद्घाटनाचा डांगोरा न पिटता एका साध्या कार्यक्रमाच्या माध्यमातून वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. पलावा चौक ते निळजे, काटई चौक दरम्यानची वाहतकू कोंडी सोडविण्यासाठी हा उड्डाण पूल महत्वाची भूमिका बजावणार आहे. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी जून अखेरपर्यंत काटई निळजे रेल्वे उड्डाण पूल वाहतुकीसाठी खुला होईल असे आश्वासन प्रवाशांना दिले होते. काही तांत्रिक अडथळे, स्थापत्य कामामुळे पूल जून अखेरपर्यंत एमएमआरडीएला वाहतुकीसाठी सुरू करता आला नव्हता.

दिलेले आश्वासन आमदार मोरे यांनी न पाळल्याने ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे, मनसेचे नेते राजू पाटील यांच्या पुढाकाराने काही दिवसांपूर्वी पलावा चौक भागात संयुक्त मोर्चा काढून काटई निळजे उड्डाण पुलाचे काम लवकर पूर्ण करून या भागातील कोंडीला पूर्ण विराम द्या. अन्यथा उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला होता.

## संपाची पुढील दिशा ठरवण्यासाठी मालवाहतूक संघटनांची आज बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील अवजड वाहने, मालवाहतूकदार संघटनांनी संप सुरू केला असून या संपाला अपेक्षित व्यापकता न आलेली नाही. परिणामी, संपाची पुढील दिशा ठरविण्यासाठी वाशी येथे ५ जुलै रोजी बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला राज्यातील सर्व मालवाहतूकदार संघटनेच्या प्रमुखांना बोलवण्यात आले आहे.

जीवनावश्यक आणि अत्यावश्यक वस्तूंची वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांवर वाहतूक पोलीस, परिवहन विभागाकडून इ-चलनाद्वारे दंडात्मक कारवाई करीत आहेत. हे सर्व दंड माफ करण्यात यावेत, क्लिनरची सक्ती रद्द करावी, शहरातील अवजड वाहनांची येण्या-जाण्याच्या वेळांचा पुनर्विचार करावा, अशी मागणी राज्यातील मालवाहतूकदार संघटनांनी केली आहे. त्यानुसार, राज्यातील सर्व खासगी बस, मालवाहतूकदार आणि राजकीय पक्षाच्या वाहतूक संघटना एकत्र येऊन वाहतूकदार बचाव कृती समिती स्थापन केली होती. परंतु, वाहतूकदार बचाव कृती समितीमधील एकेका संघटनेने माघार घेतली.

शालेय बस आणि खासगी बस संघटनांनी संप सुरू करण्याआधीच माघार घेतली. तसेच संप सुरू झाल्यापासून मुंबईतील जीवनावश्यक आणि अत्यावश्यक सेवेचा पुरवठा होत असून, घाऊक बाजारात मालाची व्यवस्थित आवक होत आहे. परिणामी, राज्यस्तरीय चक्का जामबाबत ट्रक, टेम्पो, टँकर, ट्रेलर संघटनांचे प्रमुख व सदस्यांची बैठक वाशी येथे आयोजित करण्यात आली आहे. संपाची पुढील रणनीती आखण्यासाठी राज्यातील मालवाहतूकदार संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांना या बैठकीला आमंत्रित करण्यात आले आहे.

## डोंबिवलीतील रेतीमाफियांच्या बोटींना महसूल प्रशासनाकडून जलसमाधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - मागील वर्षभर कल्याण, डोंबिवली महसूल विभागाची कोपर, रेतीबंदर, मोठागाव, कुंभारखाणपाडा, देवीचापाडा भागात वाळू माफियांच्या विरुध्द जोरदार कारवाई सुरू आहे. या कारवाईत माफियांची लाखो रूपयांची सामग्री यापूर्वीही नष्ट करण्यात आली आहे. तरीही नवीन सामग्री तयार करून पुन्हा खाडी पात्रात बेकायदा वाळू माफिया उपसा करण्यासाठी सक्रिय होतात.

गुरूवारी दुपारी डोंबिवली जवळील मोठागाव रेतीबंदर, कुंभारखाण पाडा भागात उल्हास खाडीला उधाण आले आहे. अशा परिस्थितीत खाडी पात्रात वाळूचा बेकायदा उपसा करणारी वाळू माफियांची ३० लाख रूपयांची यांत्रिक सामग्री महसूल डोंबिवली, कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी गुरूवारी खाडी पात्रात बुडून टाकली. काही सामग्रीला आग लावून ती भस्मसात केली.




उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर, कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या सूचनेवरून डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखाणपाडा रेतीबंदर पट्टयात बोटीच्या साहाय्याने गस्त घालत होते. खाडीच्या मध्यभागी वाळू माफिया बेकायदा वाळू उपसा करत आहेत, असे गस्ती बोटीवरील महसूल अधिकाऱ्यांना दिसले. यावेळी बार्जेससोबत असलेल्या उपसा पंपांना गॅस कटरने कापून हे पंप आणि त्या सोबतच्या बोटी पाण्याने भरताच खाडी पात्रात बुडविण्यात आल्या. उपसा पंप आणि बोटींवरील यंत्रसामग्रीचा पुन्हा वापर होऊ नये म्हणून ती यंत्रणा साखर, मीठाचा भडीमार करून पेटवून आगीत भस्मसात करण्यात आली. चौदा लाखाचे दोन बार्जेस, सोळा लाखाचे चार उपसा पंप अशी एकूण ३० लाखाची वाळू माफियांची सामग्री महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी खाडीत बुडवली.

## कल्याण बदलापूर अतिरिक्त रेल्वे मार्गिकेतील झाडांचा अडसर दूर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** कल्याण बदलापूर दरम्यानच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकच्या उभारणीच्या कामात आड येणारी १०६ झाडे हटवली जाणार आहेत. त्यासाठी स्थानिक नगरपालिकांना मुंबई रेल्वे विकास मंडळाकडून निधीचे वितरणही करण्यात आले आहे. बदलापूर शहरात ४१, अंबरनाथ शहरात ६५ तर उल्हासनगर शहरात इतकी झाडे हटवली जाणार आहेत. त्यांच्या पुनर्रोपणासाठी कुळगाव बदलापूर नगरपालिकेने याची यादी जाहीर केली असून त्यावर हरकती आणि सूचना मागवल्या आहेत.

मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या टप्पा तीन अ मधील या कल्याण बदलापूर तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकचे काम ३० टक्के पूर्ण झालेले आहे. सुमारे १ हजार ५०१० कोटी रूपये खर्चातून हा प्रकल्प मार्गी लावला जातो आहे. यात पाच स्थानके आणि ५१ पुलांचे काम केले जाणार आहेत. काही उड्डाणपुलांची कामे सुरू असून काही पूर्ण करण्यात आली आहेत. विठ्ठलवाडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर येथे बांधकामे सुरू आहेत. विठ्ठलवाडी स्थानकातील फलाटांची लांबी वाढवण्याचे कामही सुरू आहे. याच टप्प्यात चिखलोली स्थानकाची निर्मिती, त्यासाठी टाकल्या जाणाऱ्या रेल्वे मार्गिका, त्यांचे विद्युतीकरण अशीही कामे यात समाविष्ट आहेत. गेल्या अनेक महिन्यांपासून काम सुरू असले तरी याचा वेग संथगतीने असल्याचा आरोप होतो आहे. त्यामुळे या मार्गाच्या उभारणीसाठी वेगाने पाऊले उचलण्याची मागणी होत होती.



### पालिकांकडून नोटीसा जारी

### १०६ झाडांचे होणार पुनर्रोपण

## कल्याण बाजार समितीचे संचालक किशोर वाडेकर यांचा भाजपा मध्ये प्रवेश



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** बदलापूर कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची नुकतीच निवडणूक झाली. या निवडणुकीत ऐन वेळी उमेदवारी मिळवून भाजपा मध्ये प्रवेश केलेले ग्रामपंचायत अनुसूचित जाती जमाती मतदार संघातील संचालक किशोर वाडेकर यांनी आमदार किसन कथोरे साहेबांच्या उपस्थित आज शुक्रवार दिनांक 4 जून रोजी बदलापूर येथील भाजपा कार्यालयात जाहीर प्रवेश केला.

यावेळी माजी नागराध्यक्ष राजन घोरपडे, जिल्हा संघटन मंत्री संभाजी शिंदे, शहर प्रमुख रमेश सोळसे, किरण भोईर, संचालक रवींद्र घोडविंदे, रवींद्र भोईर, प्रमोद देशमुख, पांडुरंग म्हात्रे, महेश देशमुख, योगेश देशमुख, म्हारळचे उपसरपंच कोंगेरे, पद्मकर हरड, , केतन देशमुख, काशिनाथ मगर, अनिल दळवी, राजू मगर., आकाश सुरोशी, अजय जाधव, सुयोग मगर. यांच्या सह कार्यकर्ते उपस्थित होते.






# गीतासार



### अध्याय १५
### पुरुषोत्तमयोगः

यतन्तो योगिनश्चैनं पश्यन्त्यात्मन्यवस्थितम् । यतन्तोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यन्त्यचेतसः ॥ १५-११ ॥

योगीजनही आपल्या हृदयात असलेल्या या आत्म्याला प्रयत्नानेच तत्त्वतः जाणतात; परंतु ज्यांनी आपले अंतःकरण शुद्ध केले नाही असे अज्ञानी लोक प्रयत्न करूनही या आत्मस्वरूपाला जाणत नाहीत. ॥ १५-११ ॥

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् । यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ १५-१२ ॥

सूर्यामध्ये राहून जे तेज सर्व जगाला प्रकाशित करते, जे तेज चंद्रात आहे आणि जे तेज अग्नीत आहे, ते माझेच तेज आहे, असे तू जाण. ॥ १५-१२ ॥

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा । पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥ १५-१३ ॥

आणि मीच पृथ्वीत शिरून आपल्या शक्तीने सर्व भूतांना धारण करतो आणि रसरूप अर्थात अमृतमय चंद्र होऊन सर्व वनस्पतींचे पोषण करतो. ॥ १५-१३ ॥

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः । प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १५-१४ ॥

मीच सर्व प्राण्यांच्या शरीरात राहणारा, प्राण व अपान यांनी संयुक्त वैश्वानर अग्निरूप होऊन चार प्रकारचे अन्न पचवितो. ॥ १५-१४ ॥

# डॉ. मनिषा देवगुणे यांची खारपाडा शाळेस भेट




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक सेमी इंग्लिश शाळा खारपाडा या शाळेस सहाय्यक आयुक्त कोकण भवन डॉ. मनीषा देवगुणे यांनी ३ जुलैला भेट देऊन शाळेची शैक्षणिक व विद्यार्थी प्रगती बाबत आढावा घेतला प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांचा अभ्यास व मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधा याबाबत हितगुज केले . सन 2024/25 या वर्षात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक मिळाल्या बद्दल मुख्याध्यपक व शिक्षक यांचे विशेष कौतुक केले .रायगड जिल्हा परिषद आयोजित भोपाळ अभ्यास दौरा यामध्ये खारपाडा शाळेतून 3 विद्यार्थिनी 3 विद्यार्थी व सहशिक्षिका सौ .नंदिनी कदम यांची निवड केली त्याबाबत तसेच शाळेत राबविले जाणारे विविध उपक्रम विद्यार्थी पटसंख्या याबाबत माहितीचा आढावा घेतला व चांगल्या कामगिरीबद्दल विद्यार्थी शिक्षक यांचे अभिनंदन केले जवाहर नवोदय विद्यालय परीक्षेत चालू वर्षी तालुक्यातून ग्रामीण मधून खारपाडा शाळेतून 2 विद्यार्थ्यांची व शिष्यवृत्ती धारक तालुक्यातून 3 विद्यार्थी शाळेतून निवड झाल्याने मॅडम यांनी त्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन विशेष अभिनंदन व कौतुक केले तसेच शाळेचे रायगड जिल्हा शिवभूमी आदर्शपुरस्कार प्राप्त शिक्षक व मुख्याध्यापक प्रविण पाटील जेष्ठ तंत्रस्नेही शिक्षक दिनकर पाटील ,सौ .नंदिनी कदम,सौ .ज्योती पाटील ,सौ .संगीता पाटील व श्रीम .सुरेखा रुपनर या सर्व शिक्षक वृंद यांचे विशेष कौतुक केले व पुन्हा एकवेळ शाळेस भेट देण्याचे वचन दिले .

सदर भेटी दरम्यान रविकिरण पाडवी (तपासणी समन्वयक कोकण भवन) प्रमोद पाटील (प्रभारी गटशिक्षण अधिकारी) प्रविण पाटील (प्रकल्प अधिकारी) मुकुंद पाटील (केंद्रप्रमुख जिते) यांनी शाळेस भेट देऊन विद्यार्थ्यांस मोलाचे मार्गदर्शन केले .

कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार सौ .नंदिनी कदम तर मान्यवरांचे स्वागत ईशस्तवन व स्वागत गीत शाळेतील कलापथक विद्यार्थी व मुख्याध्यापक यांनी केले.

# बालक मंदिर शाळेतील मुलांनी काढली वारकरी दिंडी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणमधील बालक मंदिर संस्थेच्या प्राथमिक शाळा आणि बाल रंगभूमी परिषद कल्याण शाखेच्या सहकार्याने आणि इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळेच्या सहभागाने, इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवारी बालक मंदिर संस्था प्राथमिक शाळा ते विठ्ठल मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत वारकरी दिंडी काढली, ज्याचा उद्देश त्यांचा सांस्कृतिक वारसा जपणे होता.

कल्याणमधील बालक मंदिर संस्थेचे कार्यवाह सुश्रुत वैद्य, बालक मंदिर संस्था प्राथमिक शाळेचे अध्यक्ष रमेश गोरे आणि बाल रंगभूमी परिषद कल्याण शाखेचे प्रमुख कार्यवाह शिवाजी शिंदे यांच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन करण्यात आले. बालक मंदिर संस्थेच्या प्रमुख कार्यकारी अधिकारी वैदही बागुल, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा प्रेरणा माळी आणि कोषाध्यक्ष सरिता शेदड, बालरंग भूमिचे परिषदेचे सर्व कार्यकर्ते आणि सर्व पालक प्रतिनिधी उपस्थित होते. या वारकरी दिंडीत सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी विद्यार्थ्यांनी



विठ्ठल रुक्मिणी, संत नामदेव, संत तुकाराम अशा विविध संतांची वेशभूषा केली होती. संत ज्ञानेश्वरांची पालखी संगीताच्या गजरात आणि विठ्ठलनामाच्या जयघोषात काढण्यात आली. वारकऱ्यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने पालखीची शोभा वाढली. वारकरींच्या वेशभूषेत विद्यार्थी हातात डफ घेऊन विठ्ठलाच्या नावाचा जयघोष करत होते. त्याचबरोबर त्यांनी हातात फलक घेऊन वृक्ष संवर्धन, पर्यावरण जागरूकता आणि साक्षरता याबद्दल जनजागृती केली, जसे की "झाडे लावा, झाडे वाचवा", "पर्यावरणाचे रक्षण करा", "प्लास्टिक पिशव्यांशी असलेले नाते तोडून पर्यावरणाचे रक्षण करा", "नवीन साक्षरता दिंडी" आणि जनजागृती करण्यासाठी सामाजिक कार्य करणे. या दिंडीमध्ये शाळेतील विद्यार्थ्यांसह पालक आणि सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकाश पानसरे यांनी केले आणि प्रमुख पाहुण्यांचा परिचय आणि स्वागत मंगेश घाटे यांनी केले.

शाळेतील सर्व शिक्षकांनी मोठ्या उत्साहाने दिंडीत सहभाग घेतला. शाळेच्या अतिरिक्त मुख्याध्यापिका प्रतिभा मोरे आणि विद्या घुले यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले. दिंडी यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांनी खूप परिश्रम घेतले. यामुळे हा कार्यक्रम यशस्वी झाला. बालक मंदिर संस्था प्राथमिक शाळेने साजरे केलेल्या सांस्कृतिक संवर्धन आणि पर्यावरण जागरूकतेच्या अनोख्या उपक्रमांबद्दल शाळेचे समाजाच्या सर्व स्तरातून कौतुक होत असल्याची माहिती शशिकांत गवारे, सुबोध कुलकर्णी यांनी दिली.

# पडघा बस स्थानकाच्या छताला बांबूचा आधार

## लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टची दुरुस्तीची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे गावाकडून शहराकडे वाटचाल करणाऱ्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील बस स्थानकाची दुरवस्था झाली असुन चक्क छताला बांबूचा आधार दिल्याने धोकेदायक छत दुरुस्त करण्याची मागणी लोकधारा प्रतिष्ठान ट्रस्टने भिंवडी बस आगारप्रमुख यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



कित्येक वर्षापासून हा बस स्थानक आहे. त्याच स्थितीत असुन कोणाकडूनही स्थानकाची सुधारणा करण्यात आली नाही. तसेच लोकप्रतिनिधी कडुनही हे बस स्थानक नेहमी दुर्लक्षित राहीले आहे. सध्या येथून पडघा कल्याण, भिवंडी, खडवली बसेस सुटत असुन या बसच्या माध्यमातून पडघा व परिसरातील शेकडो चाकरमानी, शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, रोजंदारी कामगार महीला कामगार, शेतकरी, आदीवासी, दुकानदार, उद्योजक शिक्षणासाठी, रोजगार, उद्योगधंद्यानिमीत्त मुंबई उपनगर वांसीद शहापुर, कसारा या भागात जातात ऊन पावसापासून संरक्षण व्हावे म्हणून अनेक जण या बस स्थानकाचा आधार घेऊन बसची तासनतास वाट पाहत असतात मात्र या बस स्थानकाची अवस्था जिर्ण झाली असुन स्थानकाच्या छताला चक्क बांबूचा आधार दिल्याने छत कोसळून अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या बस स्थानकात बसणे जिकिरीचे झाले आहे यांचे गांभीर्य लक्षात घेता "लोकधारा प्रतिष्ठान" ट्रस्टचे अध्यक्ष जाधव यांनी पडघा बस स्थानकाची दुरुस्ती करण्याबाबत भिवंडी आगार प्रमुख तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांना लेखी निवेदन दिले आहे. तर राज्याचे परिवहन मंत्री यांना ईमेल द्वारे दुरूस्तीसाठी अर्ज पाठविल्याचे सांगण्यात आले तसेच काही प्रवाशी नाईलाजास्तव बस स्थानकात बसुन बसची वाट पाहतात तर पावसाळ्याचे दिवस असल्याने अनेक प्रवाशी बस स्थानक परिसरातील एखाद्या दुकानाच्या शेडखाली उभे राहून बसची वाट पाहत असल्याचे विदारक चित्र येथे पहावयास मिळत आहे त्यामुळे भिवंडी आगार प्रमुख तसेच सार्वजनिक बांधकाम उपविभाग यांनी लवकरात लवकर पडघा बस स्थानकाची दुरुस्ती करावी. अशी मागणी "लोकधारा प्रतिष्ठान " ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद जाधव यांनी केली आहे.

# डासांचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी औषध फवारणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सततचे संततधार पाऊस, ठिकठिकाणी साचलेला कचरा, झाडांच्या कापलेला फांद्या परिसरातील साचलेल्या पाण्याची डबकी, तसेच तुंबलेल्या गटारींमुळे सावरकर नगर, ठाणे परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने विधिध आजारांची लागन होत आहे. परिणामी परिसरातील नागरिक हैराण झाले आहे. डासांचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी व नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी स्थानिक माजी नगरसेविका कांचनताई चिंदरकर यांनी प्रभाग क्रमांक 14, सावरकर नगर, ठाणे येथील माऊटव्हुव, सहयोग, जगत नेक्लेव, मनिषा, श्री, साई सुदामा या म्हाडा वसाहतीमधील सोसायटीच्या



आवारातील चेंबर, शौचालय, कचरा व पाणी साचलेल्या जागा व इतर ठिकाणी डासांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना म्हणून औषध फवारणी केली आहे. या फवारणीमध्ये डासनाशक औषधांचा वापर करून डासांची उत्पत्ती थांबवण्याचा प्रयत्न केला आहे. डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे गरजेचे असल्याने नागरिकांनीही आपल्या घरातील पाण्याच्या टाक्या आणि इतर ठिकाणी पाणी साठू न देता परिसर स्वच्छ ठेवावा असे आवाहन स्थानिक माजी नगरसेविका कांचनताई चिंदरकर यांनी केले आहे.

# शासनाने पेण पोलीस वसाहत व पोलीस ठाण्यासाठी तात्काळ निधी मंजूर करावा - हरिष बेकावडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' या ब्रीदवाक्याला अनुसरून चोवीस तास डोळयात अंजन घालून जनतेचे रक्षण करणाऱ्या पोलीस बांधवांच्या पेण येथील पोलीस वसाहतींची अत्यंत दुरवस्था झाली आहे. ही वसाहत शेवटची घटका मोजत असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. पोलीस कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात आलेल्या पेण शहरातील फणस डोंगरी व पेण पोलीस ठाण्याशेजारी असणाऱ्या पोलीस वसाहतीचा अक्षरशः उकिरडा तयार झाला आहे. ही वसाहत सुस्थितीत व्हावी किंवा त्या ठिकाणी नव्या इमारतीची निर्मिती व्हावी, यासाठी सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांनी सन २०१९ मध्ये सर्व शासन स्तरावर पत्रव्यवहार करून उपोषणाचा इशारा दिल्यानंतर पोलीस अधीक्षक कार्यालय रायगड यांच्या कार्यालयात बैठक झाली. त्या वेळी चाळ व इमारतींचे स्ट्रक्चर ऑडिट करून पाडण्यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने आदेश दिले होते. येथील पोलीस प्रशासन हालचाली करण्यास तयार आहे.

ऑगस्ट २०२१ मध्ये उपविभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम पेण यांनी पोलीस वसाहतमधील इमारतीची पाहणी करून अभिप्राय दिला आहे. त्यानुसार पोलीस वसाहत पेण, फणस डोंगरी येथील पश्चिमेकडील २४ सदनिका असलेली इमारत १९८८ मध्ये तर उत्तरेकडील १० सदनिका असलेली इमारत १९८९ मधील आहे.८ सदनिकांची बैठी चाळ तसेच पोलीस ठाण्याशेजारील ८ सदनिका बैठी चाळ या सर्व इमारती पाडण्यास हरकत नसल्याचे पेण पोलीस ठाण्याला



कळवले आहे.त्याचबरोबर पोलीस ठाणे येथील जागा अत्यंत अडचणीची असून इतरही शासकीय कार्यालय त्या आवारात आहेत .त्यामुळे नागरिकांची वर्दळ नियमित चालू असते. शिवाय ही कार्यालय बाजारपेठेला लागूनच असल्याने वाहतुकीची कोंडी सातत्याने जाणवते. हे लक्षात घेऊन पेण पोलीस ठाणेचे कार्यालय सुद्धा नवीन वसाहत येथील पोलीस लाईन येथील जागेत हलविल्यास प्रशस्त इमारत होऊ शकते .त्याचबरोबर सध्याचा अतिशय महत्वाचा वाहतूक कोंडी चा प्रश्न सुटेल. याचाही विचार करून सर्व गोष्टी लक्षात घेऊन सविस्तर विस्तृत आराखडा तयार करून निधीची उपलब्धता करून शासनाने द्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते हरिष बेकावडे यांनी केली आहे.

नवनियुक्त रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनीही यामध्ये जातीने लक्ष घालून या संदर्भातील प्रस्तावाची माहिती घेऊन तात्काळ वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या कामी रायगड जिल्ह्यातील रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले आणि महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनीही विशेष लक्ष घालण्याची मागणी केली आहे.

# रेसिपी

## भुट्टा कटलेट



साहित्य-

उकडलेले कॉर्न - एक कप
उकडलेले बटाटे - दोन मध्यम आकाराचे
हिरव्या मिरच्या - दोन
आले किसलेले
कोथिंबीर
चाट मसाला -एक टीस्पून
तिखट -अर्धा टीस्पून
धणे पूड- एक टीस्पून
मीठ
ब्रेड क्रम्ब्स किंवा रवा
तेल

कृती-

सर्वात आधी मॅश केलेले बटाटे, कॉर्न आणि सर्व मसाले एका भांड्यात घाला.चांगले मिसळा आणि गुळगुळीत मिश्रण तयार करा. आता या मिश्रणापासून गोल आकाराचे कटलेट बनवा. तयार केलेले कटलेट ब्रेड क्रम्ब्स किंवा रव्यामध्ये चांगले बुडून घ्या जेणेकरून ते कुरकुरीत होतील. आता एका पॅनमध्ये थोडे तेल गरम करा आणि कटलेट दोन्ही बाजूंनी सोनेरी तपकिरी होईपर्यंत शॅलो फ्राय करा. तयार कटलेट हिरव्या चटणी किंवा टोमॅटो सॉससोबत गरमागरम सर्व्ह करा.

# मडकेपाडा येथील पंचायत समितीच्या जागेची मोजणी

## पोलीस बंदोबस्तात शासकीय मोजणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड पंचायत समितीच्या नावे मौजे साजई ग्रामपंचायत हद्दीत मडकेपाडा येथे दोन सर्वे नंबर 150 व 133 क्षेत्राचि जागा आहे. मात्र या सातबाऱ्या वरिल जागेत काही राजकीय पुढाऱ्यांनी राजकीय बळाचा वापर करुन राहण्यासाठी अनधिकृत घरे बांधली असल्याचा आरोप अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अण्णा साळवे यांनी लेखी तक्रारी द्वारे केलि असता त्याची दखल घेत मुरबाड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी डॉ. लता गायकवाड यांनी तात्काळ शासकीय मोजणीची कारवाई हातात घेतली. त्या अनुषंगाने दि.3 जुलै रोजी मोठ्या पोलीस फौज फाट्यासह भूमिअभिलेख कार्यालया मार्फत मोजणी करण्यात आली यावेळी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी लता गायकवाड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे



उप अभियंता संजय कोरडे , पोलीस निरीक्षक संदीप गिते , पोलीस कर्मचारी आणि पंचायत समितीचे कर्मचारी, तसेच लगतचे शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

परंतु सध्या पावसाळा असल्याने हि मोजणी करू नये पुढे ढकलण्यात यावि यासाठी लगतच्या शेतकऱ्यांनी लेखी हरकत घेतली होती तथापि या हरकतीला न जुमानता मोठ्या

### अण्णा साळवे यांच्या तक्रारीची घेतली दखल

पोलीस बंदोबस्तात या जागेची मोजणी पुर्ण केली असून मोजणी चा अहवाल प्राप्त झाल्या नंतर पुढचि कारवाई करणार असल्याचे गटविकास अधिकारी लता गायकवाड यांनी म्हटले आहे.

दरम्यान पंचायत समितीच्या नावे असणाऱ्या सातबारावर ज्या लोकांनी अतिक्रमण करुन घरे बांधली असल्याचि तक्रार आण्णा साळवे यांनी केली असून सदर बांधकमाला ग्रामपंचायत सरपंच, ग्रामसेवक, यांनी टॅक्स आकारणी,असेसमेंट कोणत्या पुराव्याच्या आधारे केली याची चौकशी करण्याची मागणी तक्रार दार आण्णा साळवे यांनी केली आहे.












**मेष**
कुटुंबात विशेष लोकांचे आगमन होऊ शकते, तुम्ही त्याच्या तयारीत व्यस्त असाल. आज तुम्हाला आयुष्यातील काही मोठा निर्णय घ्यायचा आहे.

**वृषभ**
तुमच्या वैवाहिक जीवनात खूप आनंद असेल. सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होऊ शकते आणि चांगली बातमी मिळेल.

**मिथुन**
तुमच्या मेहनतीने व्यवसायात प्रगती कराल. आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल.नियोजित कामे वेळेवर पूर्ण होताना दिसत आहेत.

**कर्क**
कामे वेळेपूर्वी पूर्ण केल्याने तुम्हाला आनंद मिळेल. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये निष्काळजीपणा आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो.

**सिंह**
कायदेशीर कामासाठी धावपळ केल्यामुळे थकवा जाणवेल. आज आपल्याला वैवाहिक जीवनात एकमेकांना समजून घ्यावे लागेल.

**कन्या**
व्यवसायात सुखद बदल होतील.तुमच्या जीवनात पैशाशी संबंधित काही समस्यांमुळे तुम्ही त्रस्त होऊ शकता.जीवनसाथीसोबत वाद होऊ शकतो.

**तूळ**
एखादी छोटीशी बाबही भांडणाचे रूप धारण करू शकते, ज्यामुळे तुम्ही अडचणीत येऊ शकता. तुमच्या जोडीदारासाठी काही खास करू शकता.

**वृश्चिक**
नवीन व्यवसाय सुरू केला असेल तर त्यात चांगला नफा मिळेल.आज तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल खूप आनंदी असेल. तुमच्या मनात आनंद होणार नाही.

**धनु**
अध्यात्माद्वारे तुमचे मन शांत ठेवण्याचा प्रयत्न कराल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. सुखद क्षण अनुभवाल. नोकरीतील बदलामुळे चांगली प्रगती होण्याची शक्यता आहे.

**मकर**
तुम्हाला तुमच्या मेहनतीचे चांगले फळ मिळेल. दिवस तुमच्यासाठी आनंदाने भरलेला असणार आहे. आज तुम्हाला समाजात मान-सन्मान मिळेल .

**कुंभ**
तुमचे मन खूप समाधानी राहील. तुमचे मन धार्मिक कार्यक्रमात व्यस्त राहील. कुटुंबात शांततेचे वातावरण असेल. नोकरदार लोकांसाठीही दिवस चांगला राहील.

**मीन**
तुमच्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी तुम्ही काही नवीन काम देखील करू शकता, ज्यामध्ये तुम्हाला आर्थिक फायदा होईल.दिवस चांगला जाईल.



# शाळेतील शिपाई काका कालबाह्य होणार ?

## निवृत्तीनंतर शिपाई पद कायमस्वरूपी रद्द होणार - शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील मान्यताप्राप्त सर्व खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेतील व उच्च माध्यमिक शाळांमधील शिपाई अतिरिक्त झाल्यास त्यांचे दुसऱ्या शाळेत समावेशन करण्यात येणार आहे.

तसेच हे शिपाई निवृत्त झाल्यावर ते पद कायमस्वरूपी रद्द करून त्याजागेवर मानधनावर कंत्राटी पद्धतीने शिपाई घेण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी गुरुवारी विधान परिषदेत स्पष्ट केले. शिक्षक आमदारांनी यावर जोरदार आक्षेप नोंदवत सभात्याग केला. याविषयीची लक्षवेधी आमदार

**राज्यातील खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिपायांचे पद निवृत्त झाल्यावर कायमस्वरूपी रद्द करणे आणि त्याऐवजी कंत्राटी शिपायांची नियुक्ती केली जाणार, असा निर्णय शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत जाहीर केला. यावर शिक्षक आमदारांनी विरोध केला आहे.**

अरुण लाड, इद्रिस नायकवडी आदी आमदारांनी उपस्थित केली होती. त्याला उत्तर देताना दादा भुसे म्हणाले.

मान्यताप्राप्त सर्व खासगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळेतील व उच्च माध्यमिक शाळांमधील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांसाठी आकृतिबंध लागू करण्याऐवजी विद्यार्थी पटसंख्येच्या आधारे प्रतिशाळा शिपाईभत्ता लागू करण्यात आला आहे. पदावरील कर्मचारी निवृत्त झाल्यावर ते पद आपोआप रद्द होईल व त्यानंतर कंत्राटी पद्धतीने नियुक्ती केली जाणार आहे.

आमदार लाड, काळे यांनी या निर्णयास विरोध केला. शाळेमध्ये शिपाईपद अतिशय महत्त्वाचे असून ते कंत्राटीपदावर भरले गेल्यास बदलापूरसारख्या घटनांची भीती राहील. कंत्राटी कर्मचारी जबाबदारीने काम करत नाहीत याकडे लक्ष वेधत या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी त्यांनी केली. भुसे यांनी यावर बैठक घेण्याचे आश्वासन दिले.

# दिवा - मुंब्र्यातील अनधिकृत शाळांना सील ठोका - आ. संजय केळकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. 4 :** मुंब्रा आणि दिव्यात ८१ अनधिकृत शाळा असून त्यापैकी फक्त तीन शाळांवर कारवाई करण्यात आली. या शाळांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असताना अधिकाऱ्यांच्या संगनमताने त्यांचे पेव फुटल्याचा आरोप आमदार संजय केळकर यांनी अधिवेशनात केला. या शाळांवर ठोस कारवाई करण्याची गरज असून त्या सील कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

ठाणे, मुंब्रा, दिवा भागात अनधिकृत शाळांची संख्या ८१ झाली असून त्यातील ७० शाळा एकट्या दिव्यात आहेत. गेल्या २१ महिन्यांत दिव्यात ३९ अनधिकृत शाळांची भर पडली आहे. विशेष म्हणजे या सर्व शाळांच्या संस्थाचालकांवर गुन्हे दाखल करूनही फक्त तीन शाळांवरच कारवाई केली आहे. या शाळांना ६५ कोटींचा दंड ठोठावण्यात आला असून तो अद्याप जमा केलेला नाही. या पार्श्वभूमीवर येथील अधिकृत शाळांनी बंद पुकारला होता. तसेच आमदार केळकर यांना भेटून भूमिका मांडली होती. अनधिकृत शाळांमुळे पालकांचे नुकसान तर होतेच पण विद्यार्थ्यांचेही भविष्यात मोठे नुकसान होणार असल्याने केळकर यांनी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्याद्वारे या शाळांवर ठोस कारवाई करण्याची मागणी केली.

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून अनधिकृत शाळा अद्याप सुरू असल्याने विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होणार आहे. त्या- त्या यंत्रणा अशा शाळांवर कारवाईची प्रक्रिया करत असतात, पण संगनमतामुळे या शाळा अद्याप सुरूच आहेत. किंबहुना आणखी वाढत असल्याची खंत केळकर यांनी व्यक्त केली. आतापर्यंत तीनच शाळांवर कारवाई करण्यात आल्याने झारीतले शुक्राचार्य कोण, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या शाळांची पाणी आणि वीज जोडणी तोडून त्या सील करण्यात याव्यात, जेणेकरून विद्यार्थ्यांचे संभाव्य शैक्षणिक नुकसान टळेल, अशी मागणी केळकर यांनी केली आहे.



# मीनाताई ठाकरे रुग्णालयातील अतिदक्षता विभाग बंद

## वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना घेराव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नेरूळ, ता. 4 (बातमीदार):** नेरूळमधील नवी मुंबई महापालिकेच्या मीनाताई ठाकरे रुग्णालयातील अतिदक्षता विभाग सुरू करण्यात आला नाही. तो लवकरात लवकर सुरू करावा, या मागणीसाठी नवी मुंबई राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांना बुधवारी (ता. २) घेराव घालण्यात आला.

नेरूळ येथील माँ मीनाताई ठाकरे रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून अतिदक्षता विभाग उपलब्ध नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत, रुग्णांना अतिदक्षता विभागात ठेवण्याची गरज भासल्यास त्यांना महापालिकेच्या वाशी किंवा मुंबईमधील केईएम रुग्णालयामध्ये जावे लागते. त्यामुळे नवी मुंबई महापालिकेने एक कोटी ८० लाख रुपये खर्च करून मीनाताई ठाकरे रुग्णालयात अतिदक्षता विभाग उभारला; मात्र येथे रुग्णांना सुविधा उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे महापालिका रुग्णांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप कार्याध्यक्ष नितीन चव्हाण यांनी केला आहे. या वेळी आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे यांनी येत्या सात दिवसांत आयसीयू सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. त्यामुळे हे आश्वासन पूर्ण न झाल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आयुक्तांच्या दालनाबाहेर तीव्र आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला आहे.

**नागरिकांच्या कराचा अपव्यय**

नवी मुंबई महापालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये लाखो रुपयांची तरतूद करूनसुद्धा सामान्य रुग्णांना अतिदक्षता विभागाची सेवा का उपलब्ध करून दिली जात नाही? त्यामुळे अनेक रुग्णांचे मृत्यू झाले आहेत. त्यांची जबाबदारी पालिका घेणार का? करदात्या नवी मुंबईकरांच्या पैशातून उभारलेले आयसीयू जर सामान्य रुग्णांना उपलब्ध होणार नसेल तर हा सार्वजनिक निधीचा अपव्यय आहे, असा आरोपी या वेळी वैद्यकीय सेलचे विभाग अध्यक्ष तुषार कचरे यांनी केला.

# पोलिसांच्या मृत्यूवर विधानसभेत चर्चा

## चार वर्षात ४२७ पोलिसांचा अकाली मृत्यू , ७५ हृदयविकाराच्या धक्काने तर २५ पोलिसांची आत्महत्या - गृहमंत्र्यांची माहिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

लंडनच्या मेट्रोपॉलिटन पोलिसांनंतर (स्कॉटलंड यार्ड) मुंबई पोलिस हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे पोलिस दल मानले जाते. पण या मुंबई पोलिसांबाबत धक्कादायक माहिती समोर येत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत गेल्या चार वर्षात 427 पोलिसांचा अकाली मृत्यू झाला आहे. तर 75 पोलिसांचा हृदयविकाराच्या धक्काने निधन झाले आहे. विविध कारणांमुळे 25 पोलिसांनी आत्महत्या केली आहे, तर कॅन्सरमुळे सहा जणांचा मृत्यू झाला आहे. विधिमंडळाचे



पावसाळी अधिवेशन सुरु आहे. यात एका प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली आहे. या प्रकरणात मृतांच्या नातेवाईकांनी कुठलीही तक्रार न केल्याने याची कारणे शोधण्यासाठी तपास करण्यात आलेला नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.

पोलिस दलात अनुकंपा तत्वावरील भरतीची प्रक्रिया सुरु करणार असून या 150 दिवसाच्या मोहीमेत हा प्रश्न सोडवण्यात येणार आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. याबाबत शिवसेनेचे सुनील शिंदे यांनी विधान परिषदेत प्रश्न विचारला होता.

मुंबईत पोलिसांसाठी ८ तास ड्युटीची संकल्पना सुरु आहे. काही वेळा सणासुदीच्या किंवा बंदोबस्तात पोलिसांना अधिक काळ ड्युटी करावी लागते, मात्र पोलिसांची ८ तासांची ड्युटी आता स्थिर झाली आहे. पोलिसांना साप्ताहिक सुट्टी देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. 40 वर्षांवरील पोलिसांची वर्षातून एकदा आणि 50 वर्षांवरील पोलिसांची वर्षातून दोनदा आरोग्य तपासणी करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे. ४० प्रकारच्या आजारांवर मोफत उपचार केले जात आहेत. त्यासाठी राज्यातील २७० रुग्णालयांशी करार करण्यात आला आहे. टाटा मेमोरियल आणि ए. के. मेहता हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने कॅन्सर तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येते, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.



# ठाणे महापालिकेकडून १५ दिवसांत १२४ बांधकामांवर हातोडा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. 4 :** उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ठाणे महापालिकेचे अतिक्रमणविरोधी पथक कामाला लागले आहे. शहरात कधी नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात येत आहे. १९ जूनपासून सुरू झालेल्या या मोहिमेत अवघ्या १५ दिवसांत १२४ अनधिकृत बांधकामांवर कारवाई केली आहे. यामध्ये शिळच्या खान कम्पाउंड येथील १८ इमारतीही भुईसपाट केल्या आहेत.

ठाणे महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांचा मुद्दा नवीन नाही. यावर अनेक आर्थिक गणिते अवलंबून असल्याने राजकारणी आणि पालिका अधिकाऱ्यांचे हातही यात गुंतले आहेत. त्यांच्या आशीर्वादानेच पालिका क्षेत्रात शेकडो अनधिकृत बांधकामे उभी राहिली; पण शिळ येथील खान कम्पाउंड परिसरातील भूखंडाचा वाद उच्च न्यायालयात गेला आणि पालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच आयुक्तांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले.

इतकेच नव्हे तर न्यायालयाने यासाठी स्वतंत्र समिती नेमून त्यांच्या देखरेखीखाली पालिका हद्दीतील सर्व अनधिकृत बांधकामांचा शोध घेऊन तत्काळ कारवाईचे आदेश दिले. न्यायालयाचा हातोडा पडताच आता पालिकेचे अतिक्रमणविरोधी पथकही कामाला लागले आहे. शिळ येथील एम. के. कम्पाउंड येथे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एकूण २१ इमारतींच्या निष्कासनाची कारवाई सुरू आहे. सुरुवातीला येथे १७ अनधिकृत इमारती असल्याची माहिती मिळाली; पण प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर ही संख्या २१ असल्याचे निदर्शनास येताच सर्व इमारती पाडण्याचे काम सुरू झाले आहे. या कारवाईत रहिवाशांचा विरोध झुगारून आतापर्यंत १८ इमारती पाडण्यात आल्या आहेत. उर्वरित इमारतींच्या निष्कासनाची कारवाई परिमंडळ उपायुक्त मनीष जोशी, उपायुक्त शंकर पाटोळे, सचिन सांगळे यांच्या उपस्थितीत करण्यात येत आहे. तसेच या मोहिमेची अंमलबजावणी आणि प्रत्यक्ष कारवाई यांचा दैनंदिन स्वरूपातील आढावा अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे घेत आहेत.



# शहापुरातील पर्यटन स्थळांवर निर्बंध

**शहापूर :** निसर्गसौंदर्य आणि ऐतिहासिक स्थळांनी नटलेला शहापूर तालुका हा पर्यटकांसाठी नेहमीच आकर्षण ठरलेला आहे. विशेषतः पावसाळ्यात शिवकालीन माहूली किल्ला, माहूली धबधबा, तानसा अभयारण्य, विहीगावचा अशोका धबधबा, कसारा घाटातील छोटे छोटे धबधबे, चोंढे घाटघर येथील धबधबे, तसेच लहान-मोठी धरणे, निसर्गरम्य आणि ऐतिहासिक स्थळे पर्यटकांना नेहमीच भुरळ घालत असतात. मात्र बऱ्याच ठिकाणी पावसाळ्यामध्ये दुर्घटना घडत असल्याने जिल्हा प्रशासनाने शहापूर तालुक्यातील धोकादायक असलेल्या ठिकाणांवर पर्यटनास जाण्यास बंदी घातली आहे. पावसाळ्यात निसर्ग सौंदर्याचा आनंद लुटत असताना काही पर्यटक पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याच्या अथवा उंच अशा डोंगरकड्यांवरून पाय घसरून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. या घडलेल्या घटनांमध्ये अनेक पर्यटकांना आपला जीवही गमवावा लागला आहे, तर काहींना कायमचे अपंगत्वही आले आहे. अशा अपघात ग्रस्त ठिकाणी सूचनाफलक लावणे जीव रक्षक टीम तैनात ठेवणे प्राथमिक आरोग्य सेवा पुरवणे अशा सुविधांची कमतरता दिसून येत आहे. काही ठिकाणी प्रतिबंधक जाळ्या, सूचनाफलक लावले असले तरी ते अपुरे पडत आहेत. असे असले तरी पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढतच आहे. यामुळे तानसा अभयारण्य, घाटघर, आजोबा पर्वत या ठिकाणी तातडीने दक्षता घेण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. विहिगाव येथील अशोका धबधबा, माहुली किल्ला, माहुली धबधबा, आजोबा पर्वत, चोंढे जलविद्युत प्रकल्प, तानसा, भातसा, मोडक सागर धरणे या पर्यटन स्थळांवर बंदी घालण्यात आली आहे.

# भिवंडीच्या दर्गारोड भागात ७४ किलो गांजा जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** भिवंडी येथील दर्गारोड भागात गांजा विक्रीसाठी आलेल्या तिघांना ठाणे पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली. फैजल अन्सारी (४४), अन्वर अन्सारी (३४) आणि अब्दुल अन्सारी (२०) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे असून पोलिसांनी त्यांच्याकडून ७४ किलो गांजा जप्त केला आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भिवंडी येथील मोमीनबाग दर्गारोड परिसरात असलेल्या अन्वर अन्सारी यांच्या घराजवळ फैजल अन्सारी हा अब्दुल रहमान अन्सारी याला गांजासारखा अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे भिवंडी गुन्हे शाखा घटक २ चे वरिष्ठ पोलिस निरिक्षक जनार्दन सोनावणे, सहाय्यक पोलिस निरिक्षक धनराज केदार आणि त्यांच्या पथकाने त्याठिकाणी सापळा रचला.

या कारवाईत फैजल अन्सारी (४४), अब्दुल अन्सारी (२०) आणि अन्वर अन्सारी यांना अटक करण्यात आले. या आरोपींची अधिक तपासणी करताना फैजल आणि अब्दुल यांच्या अंगझडतीत आणि अन्वर याच्या राहत्या घराच्या पडवीमध्ये ७४ किलो ५४८ ग्रॅम वजनाचा ३७ लाख ३७ हजार ४०० रुपये किंमतीचा गांजा हा अंमली पदार्थ सापडला असून तो पोलिसांनी जप्त केला आहे.

# मीरा भाईंदरमध्ये लाचखोर कर्मचाऱ्याला बेड्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदरमध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने मोठी कारवाई केली आहे. श्याम बोडेकर नावाच्या एका सरकारी कर्मचाऱ्याला लाच घेताना पकडले. बोडेकरने एका माणसाकडून २० हजार रुपये लाच घेतली. त्या माणसाला त्याच्या कामासाठी बोडेकरने लाच मागितली होती. एका माणसाच्या मदतीने ही लाच घेण्यात आली. यामुळे सरकारी कार्यालयांतील भ्रष्टाचाराचा आणखी एक प्रकार समोर आला आहे. श्याम बोडेकर हे मिरा-भाईंदरच्या अपर तहसीलदार कार्यालयात काम करतात. एका माणसाला बँकेने घर ताब्यात घेण्याची नोटीस पाठवली होती. कारण त्याचे बँकेचे कर्ज थकीत होते. त्याला कोर्टात जाण्यासाठी काही कागदपत्रे हवी होती. तो माणूस ती कागदपत्रे घेण्यासाठी तहसीलदार कार्यालयात गेला. तिथे त्याची भेट विनोद इंदुलकर नावाच्या एका माणसाशी झाली. इंदुलकरने बोडेकर यांच्यासाठी ६० हजार रुपयांची लाचमागितली. कागदपत्रे देण्यासाठी आणि कारवाईला मुदतवाढ देण्यासाठी ही लाच मागितली होती. याचा अर्थ, त्याला त्याचे काम करण्यासाठी ६० हजार रुपये द्यावे लागणार होते. त्या माणसाने आधी ४० हजार रुपये इंदुलकरला दिले. तरीही त्याचे काम झाले नाही. त्यामुळे त्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.

# पत्रीपूल - दुर्गाडी मार्गावरील गोविंदवाडी पूल कमकुवत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गोविंदवाडी बायपास मार्गावर नाल्यावरील पूल धोकादायक झाल्याने २०१९मध्ये त्याचे प्री कास्टिंग करण्यात आले होते. मात्र केवळ सहा वर्षांतच या पुलाची दुरवस्था झाली आहे. पुलाला जागोजागी तडे गेले असून काँक्रीटचे तुकडे उडाल्याने सळ्या बाहेर डोकावू लागल्या आहेत. शहरातील कोंडी फोडण्यासाठी अवजड वाहनांची वाहतूक या मार्गाने वळवली जात असून नवी मुंबईकडून भिवंडी-नाशिक महामार्गाकडे जाणाऱ्या वाहनांना हा मार्ग सोयीचा पडतो. त्यामुळे या मार्गावर कायमच अवजड वाहनाची मोठी वर्दळ असते.

वाहतूक कोंडी फोडण्यासाठी रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून २०१६ मध्ये पत्रीपूल ते दुर्गाडी दरम्यान गोविंदवाडी बायपास रस्त्यातील नाल्यावर पूल बांधण्यात आला होता. तो पूल कमकुवत झाल्याने २०१९मध्ये १७



गर्डरच्या मदतीने २३ मीटर रुंद आणि ३५ मीटर लांबीचा पूल ३ कोटी ५० लाख रुपये खर्चुन कमीत कमी वेळेत तयार करण्यात आला होता. दरवर्षी पावसाळ्यात गोविंदवाडी बायपासवर खड्डयांचे जाळे निर्माण होते. अवजड वाहनाची ये-जा आणि खड्डयांमुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे. आता माध्यमातून काँक्रीटीकरणाचे एमएमआरडीएच्या या रस्त्याच्या काम हाती घेण्यात आलेले आहे. मात्र, स्वप्नील शेजवळ पत्रीपुलाच्या दिशेने गोविंदवाडी बायपास जोडणारे नाल्यावरील पुलाची केवळ सहा वर्षांत दुरवस्था झाल्याने या कामाच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दिवसरात्र अवजड वाहनांची येजा सुरू असणाऱ्या गोविंदवाडी बायपास रस्त्यावर दुर्गाडी चौकापासूनच जागोजागी खड्डे पडले आहेत. पत्रीपुलालगत असलेल्या नाल्यावरील पुलावर पडलेले खड्डे, डोकावणाऱ्या सळ्या, पुलावर पडलेल्या मोठमोठ्या भेगा यातून वाट काढणे छोट्या वाहनासाठी मोठी कसरत ठरत आहे. शहराचा मुख्य नाला याच पुलाखालून जात असल्याने एखादी दुर्घटना घडल्यास मोठी हानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



# वसई-विरार पोलिसांना बॉम्ब शोधक पथकांची प्रतीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाची स्थापना होऊन जवळपास पाच वर्षांचा कालावधी पूर्ण होत आला आहे. मात्र अद्याप आयुक्तालयासाठी आवश्यक असलेले बॉम्ब शोधक आणि निष्क्रियकरण (बीडीडीएस) आणि श्वान पथक स्थापन झालेले नाही. परिणामी, संशयास्पद वस्तू आढळल्यास पोलिसांना अनुभव नसताना जीव धोक्यात घालून कारवाई करावी लागत आहे.

मिरा भाईंदर व वसई विरार शहराची वाढती लोकसंख्या व येथील गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी ठाणे व पालघर ग्रामीण पोलिस विभागाचे विभाजन करून २०२० साली स्वतंत्र आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली आहे. स्थापनेनंतर मनुष्यबळात वाढ, पोलिस ठाण्यात वाढ, सायबर पोलीस ठाणे आणि इतर आधुनिक गोष्टीची उभारणी प्रशासनामार्फत करण्यात आली आहे. मात्र अदयापही अनेक महत्वाच्या गोष्टीचा समावेश यात झालेला नाही.

विशेषतः बीडीडीएस व श्वान पथकाची अनुपस्थिती ही पोलिस यंत्रणेच्या दृष्टीने मोठी अडचण ठरत आहे. मिरा-भाईंदर व वसई-विरार हे क्षेत्र मुंबई व ठाणे या संवेदनशील शहरालगत असून, याआधी येथे दहशतवादी कारवायांशी संबंधित संशयितांना अटक करण्यात आली आहे. तसेच, देशभरातून गुन्हा करून आलेले आरोपी येथे लपून बसल्याचे अनेकवेळा निदर्शनास आले आहे. काही वर्षांपूर्वी शहरात बॉम्बस्फोटाच्या धमक्या देखील प्राप्त झाल्या होत्या. तर नुकताच विविध ठिकाणी शाळेत बॉम्ब ठेवल्याच्या धमकीचे ईमेल येत आहेत.



## नदी शुद्धीकरण प्रकल्पासाठी तीन टप्प्यांत काम सुरु

**– उद्योग मंत्री उदय सामंत**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील महत्त्वाच्या नद्यांचे शुद्धीकरण करण्यासाठी सरकारने तीन टप्प्यांत प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी-चिंचवड, पुणे आणि परिसरातील पवना, इंद्रायणी, मुळा-मुठा नद्यांचे प्रदूषण कमी करून त्यांचे संपूर्णपणे शुद्धीकरण करण्यासाठी हे प्रकल्प राबवले जात आहेत, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली. विधानपरिषद सदस्य श्रीमती उमा खापरे यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने पवना, मुळा व इंद्रायणी या नद्यांचे पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासंदर्भात प्रश्न विचारला होता. विधानपरिषद सदस्य सचिन अहिर यांनीही उपप्रश्न विचारला.

याबाबत अधिक माहिती देताना उद्योग मंत्री श्री.सामंत म्हणाले की, इंद्रायणी आणि पवना नदी प्रकल्पाचा (PMRDA मार्फत) एकूण खर्च: ▯671 कोटी असून यास 60 टक्के केंद्र शासन, 40 टक्के पीएमआरडीए निधी वाटप करण्यात येणार आहे. पवना नदी प्रकल्पाचा (PMRDA मार्फत) खर्च: ▯218 कोटी असून याबाबतचा निधी 60 टक्के केंद्र, 40 टक्के स्थानिक तर सीईटीपी प्रकल्पाचा खर्च (MIDC मार्फत) ▯1200 ते ▯1500 कोटी असून एमआयडीसी क्षेत्रातील औद्योगिक सांडपाण्याची शुद्धता तपासणे हा याचा उद्देश आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी 'जायका' कडून कर्ज घेण्याची प्रक्रिया सुरू असून प्रस्ताव दाखल केला गेला आहे. यावर "इंद्रायणी-पवना नद्यांचे उगमपासून संगमापर्यंत संपूर्ण शुद्धीकरण करण्यात येणार आहे." असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आळंदी येथे नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात जाहीर केले असल्याचेही श्री.सामंत यांनी यावेळी सांगितले. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली या तीनही विभागांची बैठक होईल, असेही श्री.सामंत यांनी सांगितले.

## नाल्यात अडकलेल्या व्यक्तीची अग्निशमन दलाकडून सुटका




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ड प्रभागक्षेत्रातील विठ्ठलवाडी नजीकच्या खडेगोळवली मुख्य नाल्यात पाण्याच्या प्रवाहात अडकलेल्या व्यक्तीला अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याच्या प्रवाहातून सुखरुप बाहेर काढल्याची घटना गुरुवारी घडली.

प्रवीण पवार नावाची व्यक्ती महालक्ष्मी शॉपिंग सेंटरजवळील मोठ्या नाल्याजवळ बाटल्या वेचण्यासाठी गेली असता, मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत तोल जाऊन नाल्यात पडली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन विभागाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तत्काळ कारवाई करीत वेगाने वाहणाऱ्या नाल्यातील पाण्याच्या प्रवाहातून मोठ्या दमछाकी अंती अग्निशमन दलाच्या जवानांनी संबंधित व्यक्तीस सुरक्षितपणे बाहेर काढले. सुदैवाने त्या व्यक्तीला कोणतीही गंभीर दुखापत झाली नसून ती व्यक्ती सध्या स्थिर व सुरक्षित असल्याचे ड प्रभाग सहाय्यक आयुक्त उमेश यमगार यांनी सांगितले. तरी नागरिकांनी अशा ठिकाणी काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे, अन्यथा जीवितास धोका निर्माण होऊ शकतो असे सतर्कतेचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## शनिवार-रविवारी अलिबाग-वडखळ मार्गावर जड वाहनांची वाहतूक बंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** जिल्ह्यातील पर्यटनस्थळांकडे येणाऱ्या मोठ्या प्रमाणातील पर्यटकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आणि वाहतूक कोंडी टाळण्यासाठी अलिबाग ते वडखळ राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ ए या मार्गावर दर शनिवार व रविवार जड-अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी घालण्यात आली आहे, अशी अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

या महामार्गावरून मोठ्या प्रमाणात पर्यटक आपल्या खासगी वाहनांद्वारे येत असल्याने दर आठवड्याच्या शेवटी येथे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. यामुळे रुग्णवाहिकांना अडथळा, तसेच अपघाताची शक्यता वाढते. पोलिस अधीक्षक रायगड यांनी सुचविलेल्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. वाहतूक बंदीचे वेळापत्रक,शनिवार: सकाळी ८ ते दुपारी २,रविवार: दुपारी २ ते रात्री ९ वाजेपर्यंत असे राहील. जड-अवजड वाहने (ट्रक, कंटेनर, डंपर इ.) इत्यादी वाहनांना बंदी असेल.तर दूध, डिझेल, पेट्रोल, एलपीजी गॅस,औषधे, ऑक्सिजन, भाजीपाला व जीवनावश्यक वस्तू वाहतूक करणारी वाहने,रुग्णवाहिका, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, महिला सशक्तीकरण मोहिमेसाठी नेमलेली वाहने यांना या कालावधीत मुभा असेल.

हा आदेश तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आला असून पुढील आदेश येईपर्यंत तो लागू राहील. स्थानिक नागरिक व पर्यटकांना यामुळे सुरक्षित, सोयीस्कर व अडथळा विरहित प्रवासाचा अनुभव मिळेल.

वाहनचालक व नागरिकांनी सहकार्य करावे, वाहतूक बंदीच्या वेळा लक्षात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

## महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांची स्वच्छता प्रक्रियेची पाहणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दरवर्षी पावसाळयामध्ये अतिवृष्टीच्या कालावधीत मल वाहिन्या चोकअप होवून, रस्त्या-रस्त्यावर पाणी तुंबल्याचे दिसून येते. यामुळे होणारी नागरिकांची गैरसोय लक्षात घेवून महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी काल सायंकाळी स्वत: मल वाहिन्यांच्या स्वच्छता प्रक्रियेची पाहणी केली.



महापालिकेच्या मलनि:सारण विभागाच्या अंतर्गत मल वाहिन्या व त्यावरील चेंबर्स यामधील गाळ काढणे.तसेच चोकअप तक्रारींचे निराकरण करण्याकरीता शासनाकडून प्राप्त झालेली 18 टनाची 1 सक्शन व जेटींग अँन्ड रिसायकल मशीन आणि मे.एकॉर्ड वॉटर टेक या एजन्सीमार्फत कार्यरत असलेली 31 टनाची 1 सक्शन व जेटींग अँन्ड रिसायकल मशीन अशा एकुण 2 सक्शन व जेटींग अँन्ड रिसायकल मशीन्स महापालिकेकडे कार्यरत असून, या मशीन्समार्फत कल्याण पश्चिमेतील संतोषीमाता रोड, एकविरा नगर आणि डोंबिवली पूर्वेतील शिवमंदिर परिसर या ठिकाणी सुरु असलेल्या चोकअप तक्रार निवारण कामाची प्रत्यक्ष पहाणी केली. तसेच यावेळी तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांच्या अडचणी देखील समजून घेतल्या.

यावेळी महापालिकेतील यांत्रिक विभागाचे कार्यकारी अभियंता प्रविण पवार, जनि:मनि: विभागातील उपअभियंता व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

प.पू.स. रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर(तानसा), ता.शहापूर, जि.ठाणे



आयुष्यात अत्यंत यशस्वी व मोठ्या असणाऱ्या प्रत्येक व्यक्ती त्यांच्या गुरुच्या मार्गदर्शनाखाली, त्यांनी दाखवलेल्या वाटेवरून, पुढे जात मोठ्या होतात. अगदी एकलव्याचेच उदाहरण घ्या. गुरुने त्याला नाकारले तरी त्याने सरावाच्या वेळी आपल्या गुरुंचा पुतळा उभा करून धनुर्विद्येचा अभ्यास केला. या मागचा भावार्थ असा, आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अथक परिश्रम तर हवेच पण त्याला श्रद्धेची, विश्वासाची जोडही हवी. हा विश्वास, श्रद्धा आपल्याला गुरुत दिसते. त्याच्याकडून आपल्याला प्रेरणा मिळते. ही प्रेरणा देणारी व्यक्ती आपला गुरुच आहे.

## जिल्ह्यात 'राष्ट्रासाठी मध्यस्थी' विशेष मोहिमेला सुरुवात

**वाद नको, संवाद हवा! मध्यस्थीने सुटते गुंतागुंत, नाती राहतात जिवंत!**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड :** न्यायालयीन प्रलंबित प्रकरणांमध्ये संवाद व सामंजस्याच्या माध्यमातून तडजोड साधण्यासाठी "राष्ट्रासाठी मध्यस्थी" (Mediation for the Nation) ही विशेष मोहिम रायगड जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. सर्वोच्च न्यायालय व राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार ही मोहिम दिनांक ०१ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत जिल्हा न्यायालय रायगड व सर्व तालुका न्यायालयांमध्ये राबविली जात आहे.

या मोहिमेंतर्गत कौटुंबिक वाद, मोटार अपघात नुकसानभरपाई, धनादेश न भरल्याच्या (चेक बाऊन्स) तक्रारी, वाटप दावे, वाणिज्यिक दावे तसेच इतर सर्व तडजोडयोग्य दिवाणी व फौजदारी प्रकरणे सामंजस्याच्या माध्यमातून निकालात काढण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

मध्यस्थी ही न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा जलद, खर्चिकदृष्ट्या कमी व गोपनीयता जपणारी पद्धत असून, यात कोणत्याही पक्षावर निर्णय लादला जात नाही. न्यायालयात प्रलंबित असलेल्या व तडजोडीयोग्य असलेल्या प्रकरणांमध्ये दोन्ही पक्ष आपसात थेट संवाद साधून सुसंवादातून आपली समस्या सोडवू शकतात.या मोहिमेचे मार्गदर्शन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष राजेंद्र सावंत यांच्या नेतृत्वाखाली होत असून, मोहिमेचा लाभ जास्तीत जास्त पक्षकारांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

**मध्यस्थी मोहिमेची वैशिष्ट्ये:**

स्वेच्छिक सहभाग, गोपनीयता राखली जाते, वेळ आणि खर्च वाचतो, सामंजस्यातून निर्णय, न्यायालयीन प्रक्रियेपेक्षा जलद ज्या पक्षकारांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत व ते ही प्रकरणे सामंजस्यातून मिटवू इच्छितात, त्यांनी जिल्हा न्यायालय रायगड, तालुका न्यायालय किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग येथे तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती तेजस्विनी निराळे यांनी केले आहे.

## प्रदूषण समस्येवर विधानपरिषदेत आमदार निरंजन डावखरेंची लक्षवेधी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** आज विधानपरिषदेत प्रदूषण समस्येवर आमदार निरंजन डावखरेंनी लक्षवेधी सूचना केली. यावेळी बोलताना पालघर वाडा येथील पायरसी टायर निर्मिती कंपन्यांनी केलेल्या प्रदूषणामुळे कित्येक नागरिक, कामगार बाधित झाले आहेत. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या एस.ओ.पी. ची पूर्तता न केल्यामुळे या कंपन्यांवर कारवाई झालेली आहे, पण हि कारवाई होत असताना खऱ्या अर्थाने दिरंगाई किती झालेली आहे? हे लक्षात घेणं फार गरजेचं आहे. मा. पालकमंत्री गणेश नाईक यांनी आदेश दिले त्यावेळेस हि कारवाई झाली. तरीदेखील या कारवाई संदर्भात जी दिरंगाई झालेली आहे यावर आपण शासन म्हणून कारवाई करणार का ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. यावर उत्तर देताना मा. पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी हे उदयोग बंद करून सुद्धा सुरु आहेत का? या गोष्टीच तथ्य तपासावं लागेल. या प्रकरणामध्ये होणाऱ्या प्रदूषणावर तात्काळ कारवाई करण्यात येईल. जर कुठले अधिकारी पर्यावरणाच्या बाबतीत टाळाटाळ करत असतील तर नक्कीच त्याची गंभीर दखल घेतली जाईल असे सभागृहाला सांगितले.




## भिवंडी आमदारांच्या तक्रारी दखल घेत एमएमआरडीए अधिकाऱ्यावर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील एमएमआरडीए क्षेत्रात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकाम विनापरवानगी सुरू आहेत. यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असून या सर्व बांधकामांना एमएमआरडीए मधील काही अधिकारी अभय देत आहेत.याबाबत तक्रारी करून सुध्दा दुर्लक्ष केले जात असल्याने एमएमआरडीए प्रमुख नियोजक मिलिंद पाटील यांच्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व एमएमआरडीएचे आयुक्तांनी निलंबित करण्याची कारवाई करावी अशी मागणी भिवंडी चे आमदार महेश चौघुले यांनी लेखी निवेदनाव्दारे करताच एमएमआरडीए आयुक्तांनी तातडीने दखल घेत मिलिंद पाटील यांचे सर्व अधिकार काढून घेऊन त्यांच्यावर चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश अतिरिक्त महानगर आयुक्त यांना दिले आहेत.



संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक बांधकाम परवाग्यांमध्ये अडथळा निर्माण करून विकासकांना धमकावले जात असून, परवानगी न घेता काम सुरू करण्यासाठी चिरीमिरी व्यवहार करून अभय दिले जात आहे. भिवंडीतील शहर आणि ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत गोडाऊन व इमारती उभारल्या जात आहेत. त्यामुळे शासन आदेशाची पायमल्ली होत असुन शासनाचे मोठे अर्थिक नुकसान होत आहे.

एमएमआरडीए क्षेत्रात अनाधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी तक्रारी करून सुध्दा दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे एमएमआरडीएचे अधिकारी मिलिंद पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर निलंबन व इतर शिस्तभंगाची कार्यवाही कारवाई करण्याची मागणी आमदार महेश चौघुले यांनी केली होती.त्यामुळे एमएमआरडीए आयुक्तांनी गंभीर दखल घेऊन पाटील यांच्यावर प्रशासकीय कारवाई करीत अधिकारी काढून घेतले आहे.

## मोबाईल चोरट्यांची टोळी गजाआड | वासिंद पोलिसांची दमदार कामगिरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** वासिंद येथील श्रीराम नगर मध्ये असलेल्या जियांशी मोबाईल शॉप या दुकानात मोबाईल चोरट्यांनी रात्री दुकान बंद असताना दुकानाचे शटर तोडून 68 हजार किमतीचे मोबाईल लॅपटॉप आणि इतर वस्तू चोरून पोबारा केला. याबाबत दुकानाचे मालक गणेश उमेश वारघडे यांनी याबाबतची माहिती वासिंद पोलीस ठाणे येथे कळवली असता लागलीच वासिंद पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी या चोरीच्या घटनेची दखल घेऊन तपास सुरू केला आणि वासिंद पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा रजिस्टर नंबर 117 / 2025 बी एन एस 2023 चे कलम 305,331(3)331(4) प्रमाणे गुन्हा दाखल केला. आणि लागलीच तपासाची चक्रे वेगाने फिरवली. काही तासातच मोबाईल चोरट्यांची टोळी गजाआड केली.

मा. डॉ. डी एस स्वामी पोलीस अधीक्षक ठाणे ग्रामीण, मिलिंद शिंदे उपविभागीय पोलीस अधिकारी शहापूर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपींच्या शोध कामासाठी खास पोलीस पथक तयार करण्यात आले व मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संकेत गटल्या वाघे, बळीराम वामन मुकणे, बळीराम अशोक मुकणे, जानवळ तसेच प्रसाद उर्फ पच्ची लक्ष्मण परटोले (अंबर्जे) यांना मोठ्या शिताफीने अटक करून त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल, आठ मोबाईल एक लॅपटॉप एक घड्याळ आणि मोटरसायकल असा एकूण एक लाख 38 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला

सदरची कारवाई ठाणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक डॉ. डी एस स्वामी विभागीय पोलिस अधिकारी मिलिंद शिंदे, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखेचे मनोरे वासिंद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पी वाय कादरी, पोलीस उपनिरीक्षक रावसाहेब वाघ पोलिस हवालदार युवराज चव्हाण, एम एल दहावाड, अनिल राठोड, एस डी धिंदले नितीन ढोबळे यांनी विशेष कामगिरी करून चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या. या दमदार कामगिरीमुळे वासिंद पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## निळजे पुलावर कॉँक्रीटचा चिखल !

### सकाळी उद्घाटन केलेला पूल काही तासातच बंद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली - कल्याण शीळ रोडवरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा पलावा पुल शुक्रवारी सकाळी वाहतुकीसाठी खुला झाला आणि बंद देखील झाला. कल्याण ग्रामीणचे शिवसेना शिंदे गटाचे आमदार राजेश मोरे, जिल्हाध्यक्ष गोपाळ लांडगे यांच्या उपस्थितीत शिवसैनिकांनी हा पूल घाईघाईने सुरू करत विरोधकांवर टिका केली.

मात्र पुलाचे काम शिल्लक असल्याने पुन्हा हा पूल बंद करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली आहे.




यामुळे सत्ताधाऱ्यांवर पुन्हा एकदा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. कल्याण शीळ रोड हा वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मार्ग असून या मार्गावर वाहनांची वर्दळ जास्त असल्याने वाहन कोंडीची समस्या निर्माण होते. पलावा जंक्शन हे तर वाहतूक कोंडीचे केंद्र मानले जात होते. पलावा जंक्शन येथील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी देसाई खाडी ते काटई चौक अशा दोन पुलांची उभारणी करण्यात येत आहे. मात्र पुलाचे काम शिल्लक असल्याने पुन्हा हा पूल बंद करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली आहे. यामुळे सत्ताधाऱ्यांवर पुन्हा एकदा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. कल्याण शीळ रोड हा वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मार्ग असून या मार्गावर वाहनांची वर्दळ जास्त असल्याने वाहन कोंडीची समस्या निर्माण होते. पलावा जंक्शन हे तर वाहतूक कोंडीचे केंद्र मानले जात होते. पलावा जंक्शन येथील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी देसाई खाडी ते काटई चौक अशा दोन पुलांची उभारणी करण्यात येत आहे.

## राज्याच्या समुद्रकिनारी असलेल्या कांदळवनांचे सर्वेक्षण सुरू

**– वनमंत्री गणेश नाईक**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गुजरातच्या सीमेपासून ते गोवा राज्याच्या सीमेपर्यंत राज्याच्या समुद्रकिनारी कांदळवन आहेत. या कांदळवनांचे वनविभागाच्या माध्यमातून सर्वेक्षण सुरू आहे. यामुळे लवकरच कांदळवनांच्या अचूक क्षेत्रफळाची माहिती मिळणार आहे, असे वन मंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.याबाबत सदस्य भास्कर जाधव यांनी प्रश्न उपस्थित केला होता.

प्रश्नाच्या उत्तरात वनमंत्री गणेश नाईक म्हणाले, पालघर जिल्ह्यातील कांदळवनांच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही लावण्याचा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वन , महसूल व गृह विभागाच्या अधिकाऱ्यांनी आळीपाळीने कांदळवनांच्या संरक्षणासाठी गस्त घालण्याचेही सूचित करण्यात आले आहे. मुंबईतील डेब्रिज कांदळवनांमध्ये टाकताना आढळल्यास त्यावरत कायदेशीर कारवाई करण्यात येईल. कांदळवनांच्या संवर्धनासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाबाबत सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिकाही दाखल करण्यात येईल, अशी माहितीही वनमंत्री श्री. नाईक यांनी दिली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित

**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी अॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी

संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024